महाराष्ट्र शासन
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,**
द्वारा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलूंड, नवीन इमारत, ४ था मजला,
बाळासाहेब ठाकूरवाडी, मिठागर रोड, मुलूंड (पूर्व), मुंबई-४०० ०८१
दुर. क्र. २६४७०२१६/२६४७१३५४/२६४७३०५५ वेब साईट : - mumbai.dvet.gov.in ई-मेल :-est.romumbai@dvet.gov.in

**क्रमांक : प्राकामुं/आस्था/का-१(ब)/म.लो.आ./पडताळणी/२०२५/३९८६** **दिनांक : ०७/०८/२०२५**

वाचा : १) महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचे पत्र क्र१४४२/गट-क संयुक्त-लि.ट/२०२३/चोवीस, दि.२३/०७/२०२५
२) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनाल यांचे पत्र क्र.व्यशिप्र-२०२५/आस्था-३/प्र.क्र.३३/ मलोआ/का-४, दि.३१/०७/२०२५

# परिपत्रक

महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा-२०२३ या परीक्षेतील लिपिक-टंकलेखक या सवंर्गाच्या विज्ञापित ७००६ पदांसाठी दिनांक १७ डिसेंबर, २०२३ रोजी घेण्यात आलेल्या मुख्य परीक्षेचा अंतिम निकाल दिनांक ११ जुलै, २०२५ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे संदर्भाधिन दि.२३/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परिक्षा-२०२३ या परिक्षेच्या निकालानुसार व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, मुंबई करिता (बृहन्मुंबई क्षेत्र व बृहन्मुंबई बाहेरिल क्षेत्र) लिपिक-टंकलेखक (गट-क) संवर्गातील शिफारस केलेल्या उमेदवारांची शिफारस यादी या कार्यालयास प्राप्त झालेली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्राप्त सुचनांच्या अनुषंगाने या कार्यालयास शिफारस केलेल्या सोबतच्या यादीतील बृहन्मुंबई क्षेत्र (Mumbai Region) व बृहन्मुंबई बाहेरिल क्षेत्र (Outside Mumbai) लिपिक-टंकलेखक (गट-क) संवर्गातील उमेदवारांची प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणी (Document Verification) खालील वेळापत्रकानुसार **व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, मुंबई, श्रीमद राजचंद्रजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड, नवीन इमारत, ३ रा मजला, बाळासाहेब ठाकूर वाडी, मिठागर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई-८१** येथे करण्यात येणार आहे. तरी उमेदवारांनी सोबतच्या प्रपत्रात नमूद प्रमाणपत्र/कागदपत्रांच्या मूळ प्रती, साक्षांकीत झेरॉक्स प्रती (०२ संच) व Latest Passport size Colour Photo (०२ प्रती) सह वेळेवर उपस्थित रहावे.

| अ.क्र. | पदनाम | दिनांक | वेळ | उमेदवार |
|---|---|---|---|---|
| १. | लिपिक-टंकलेखक बृहन्मुंबई क्षेत्र (Clerk Typist - Mumbai Region) | १२/०८/२०२५ | सकाळी ११.०० वाजता | शिफारस यादीतील अ.क्र.१ ते २१ |
| २. | लिपिक-टंकलेखक बृहन्मुंबई बाहेरिल क्षेत्र (Clerk Typist - Outside Mumbai) | १३/०८/२०२५ | सकाळी ११.०० वाजता | शिफारस यादीतील अ.क्र.१ ते ३१ |

सदर दिवशी प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणी (Document Verification) करिता उपस्थित न राहिल्यास उमेदवाराचे नांव पदभरती प्रक्रियेच्या टप्प्यातून वगळण्यात येईल. या संदर्भात कोणत्याही

स्वरुपातील (ऑनलाईन/ऑफलाईन/ई-मेल/SMS/Whatsapp/टपालाने/हस्तदेय) तक्रार/विनंती विचारात घेतली जाणार नाही. तसेच यापुढे प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणीची कोणतीही संधी देण्यात येणार नाही याची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणी (Document Verification) करिता उमेदवाराने व्यक्तीश: स्वखर्चाने उपस्थित रहावयाचे आहे.** उमेदवाराऐवजी अन्य व्यक्तीस/नातेवाईकास प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणी (Document Verification) करिता उपस्थित राहता येणार नाही. प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणीकरिता उपस्थित राहिल्यानंतर उमेदवाराने संबंधित मूळ प्रमाणपत्र/कागदपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणी (Document Verification) करिता बोलाविण्यात आले याचा अर्थ उमेदवाराची निवड झाली असा होत नाही.** प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणी (Document Vernification) अंती पात्र ठरलेले उमेदवार पुढील भरती प्रक्रियेकरिता पात्र ठरतील.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडुन प्राप्त सुचनांच्या अनुषंगाने उमेदवाराचे खेळाडु/दिव्यांग/नॉन क्रिमीलेअर/आर्थिक दृष्ट्या मागास/माजी सैनिक/अनाथ इत्यादी प्रमाणपत्र/कागदपत्र सक्षम प्राधिकारी/ आस्थापनांना तपासणीकरिता पाठविण्यात येतील. **उमेदवाराने सादर केलेले प्रमाणपत्र/कागदपत्र खोटे/बनावट असल्याचे आढळून आल्यास उमेदवारास सर्व पदांच्या पदभरतीच्या पुढील टप्याकरिता अपात्र ठरविण्यात येईल व उमेदवाराच्या नांवाचा समावेश काळ्या यादीत करण्यात येईल.** तसेच या विभागाच्या पदभरतीकरिता कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल. प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणीअंती पात्र ठरणाऱ्या उमेदवारांच्या नियुक्तीसंदर्भातील पुढील कार्यवाही या कार्यालयाचे स्तरावरुन करण्यात येईल. प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणीअंती उमेदवार अपात्र ठरल्यास सदर उमेदवारांचा अहवाल आयोगास सादर करण्यात येईल.

**तरी उमेदवारांनी याबाबतची नोंद घ्यावी.**

Nikam

**(नि.आ.निकम)**
**सहसंचालक**
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय,मुंबई-८१

**प्रत :**

१. मा.अवर सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई यांना माहितीस्तव.
२. मा.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-०१ यांना माहितीस्तव.

<u>प्रपत्र-२</u>

# प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणी (Document Verification) करिता आवश्यक प्रमाणपत्र/कागदपत्रांची यादी

| अ. क्र. | बाब | आवश्यक दस्तऐवज/कागदपत्रे | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) | महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले अधिवास प्रमाणपत्र | सर्व उमेदवारांकरिता आवश्यक. |
| २ | वयाचा पुरावा | सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जन्म/ वयाचा दाखला/पुरावा | सर्व उमेदवारांकरिता आवश्यक. |
| ३ | शैक्षणिक अर्हता (Educational Qualification) | संबंधित पदासाठी जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हतेबाबतचे गुणपत्रक व/किंवा प्रमाणपत्र | सर्व उमेदवारांकरिता आवश्यक. |
| ४ | टंकलेख्न प्रमाणपत्र | संबंधित पदासाठी जाहिरातीमध्ये नमूद केलेला टंकलेखन अर्हता धारण करीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र. | सर्व उमेदवारांकरिता आवश्यक. |
| ५ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन | उमेदवाराची स्वाक्षरी असलेले सोबतच्या विहित नमुन्यातील प्रतिज्ञापन | सर्व उमेदवारांकरिता आवश्यक. |
| ६ | जात/जात वैधता प्रमाणपत्र | मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले जात प्रमाणपत्र | मागास प्रवर्गातील उमेदवारांकरिता आवश्यक. जात प्रमाणपत्रासोबत सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले जात वैधता प्रमाणपत्र असल्यास ते सादर करता येईल. |
| ७ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी (EWS) प्रमाणपत्र | सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले विहीत कालावधीतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीचे (EWS) प्रमाणपत्र | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमध्ये समावेश होत असलेल्या उमेदवारांकरिता आवश्यक. |
| ८ | नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (NCL) | सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले जाहिरातीतील परिच्छेद क्र.४.११ मध्ये नमुद केलेल्या कालावधीतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठीचे (EWS) प्रमाणपत्र | उमेदवार वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इ.मा.व. या प्रवर्गातील असल्यास आवश्यक. |
| ९ | दिव्यांग प्रमाणपत्र | जाहिरातीतील परिच्छेद क्र.४.१८ मध्ये नमुद केल्याप्रमाणे दिव्यांगत्व असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र | दिव्यांग उमेदवारांकरिता आवश्यक. |
| १० | अनाथ प्रमाणपत्र | जाहिरातीतील परिच्छेद क्र.४.१९ मध्ये नमुद केल्याप्रमाणे अनाथ असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र | अनाथ उमेदवारांकरिता आवश्यक. |
| ११ | खेळाडू प्रमाणपत्र | जाहिरातीतील परिच्छेद क्र.४.१७ मध्ये नमुद केल्याप्रमाणे शासनाने घोषित केलेल्या खेळातील स्पर्धेत प्राविण्य प्राप्त केल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र | उमेदवार खेळाडू असल्यास आवश्यक. |

| अ. क्र. | बाब | आवश्यक दस्तऐवज/कागदपत्रे | शेरा |
|---|---|---|---|
| १२ | माजी सैनिक | सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त झाल्याबाबतचे दस्तऐवज/डिस्चार्ज कार्ड | उमेदवार माजी सैनिक असल्यास आवश्यक. |
| १३ | प्रकल्पग्रस्ताचा दाखला | जाहिरातीतील परिच्छेद क्र.४.२१ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेला प्रकल्पग्रस्ताचा दाखला | उमेदवार प्रकल्पग्रस्त असल्यास आवश्यक.<br>प्रकल्पग्रस्तांच्या दाखल्यात उमेदवाराच्या नांवाचा उल्लेख असणे आवश्यक. |
| १४ | भूकंपग्रस्ताचा दाखला | जाहिरातीतील परिच्छेद क्र.४.२२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेला भूकंपग्रस्ताचा दाखला | उमेदवार भूकंपग्रस्त असल्यास आवश्यक. |
| १५ | पदवी/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार | जाहिरातीतील परिच्छेद क्र.४.२३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र | उमेदवार पदवी/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार असल्यास आवश्यक. |
| १६ | ना-हरकत प्रमाणपत्र | सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले ना-हरकत प्रमाणपत्र | केंद्र/राज्य शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांना रुजू झाल्यानंतर मागील सेवेचा लाभ घ्यावयाचा असल्यास आवश्यक. |
| १७ | संगणक अर्हता प्रमाणपत्र | शासनाने विहित केलेली संगणक अर्हता धारण करीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र | उमेदवार शासनाने विहित केलेली संगणक अर्हता धारण करीत असल्यास |
| १८ | नांवात बदल झाल्या-बाबतचे प्रमाणपत्र | नांवात बदल केल्याबाबतचे अधिसूचित केलेले राजपत्र | विवाहित महिला उमेदवारांच्या बाबतीत विवाह नोंदणी प्रमाणपत्र/ लग्नानंतर नांवात बदल झाल्याबाबतचे अधिसूचीत राजपत्र. तसेच पुरुष/ महिला उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही कारणास्तव नांवात बदल झाला असल्यास नांवात बदल झाल्याबाबतचे अधिसूचीत राजपत्र. |
| १९ | ओळखपत्र | पासपोर्ट/पॅन कार्ड/आधार कार्ड/ मतदार ओळखपत्र/ड्रायव्हींग लायसन्स | सर्व उमेदवारांकरिता आवश्यक |
| २० | साक्षांकन नमुना | आयोगाच्या http://mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला साक्षांकन नमुना. | सर्व उमेदवारांकरिता आवश्यक |

उपरोक्त प्रमाणपत्र/कागदपत्रांची यादी ही नमुन्यादाखल असून या व्यतिरिक्त उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या माहितीशी संबंधीत दस्तऐवज/कागदपत्र सोबत आणणे आवश्यक राहील. अधिक माहितीकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्रसिध्द केलेली जाहिरात क्र.०१/२०२३ तसेच आयोगाकडुन वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात आलेल्या परिपत्रकातील तरतूदी उमेदवारांनी पहाव्यात.

*****

## महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम , २००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना - अ

(नियम ४ पहा)

मी श्री / श्रीमती / कुमारी ........................................................................................ श्री ...................................................... यांचा / यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय ........ वर्षे, राहणार ......................................................................................... याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

(१) मी ................................................................ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला

(२) आहे.

(३) आज रोजी मला .................... (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ................................................................ आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा.)

(४) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

सही-/

ठिकाण -:

दिनांक -: